

# मुंबईत सेमी लॉक डाऊन' ; सकाळ-संध्याकाळ दार खिडक्या बंद?

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई शहरासह उपनगरातील काही भागांमध्येही सध्या हवेची गुणवत्ता पातळी मोठ्या प्रमाणात खालावताना दिसत आहे. ज्यामुळे नागरिकांना आता आरोग्याच्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. परिस्थिती सध्या इतक्या वाईट वळणावर पोहोचली आहे की प्रशासनानेही यामध्ये लक्ष घालण्यास सुरुवात केली असून, नागरिकांना तातडीने काही सूचना केल्या आहेत.

मुंबईतील प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडल्यामुळे आता मुंबईकरांच्या दैनंदिन व्यवहारांवर निर्बंध येण्याची शक्यता आहे परिणामी आता या प्रदूषणामुळे नागरिकांना लॉकडाऊनसदृश्य परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. सध्या शहरातील नागरिकांना आरोग्याची काळजी घेत मॉर्निंग वॉक, संध्याकाळचा फेरफटका, व्यायाम, धावण्याची सवय यावर निर्बंध लादण्यात आले आहेत.

इतकेच नव्हे तर, सकाळी आणि संध्याकाळच्या वेळी घराची दारे-खिडक्या बंद ठेवण्यासंबधीच्या सूचनाही नागरिकांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय शहरातील प्रदूषणाचा अभ्यास करत नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने काही महत्वाच्या निकषांची आखणी करण्यासाठी 'टास्क फोर्स'ची स्थापना करण्याचेही निर्देश राज्यातील आरोग्य विभागाच्या आयुक्तांकडून देण्यात आले आहेत.

हवेची खालावलेली गुणवत्ता पाहता मुंबई, ठाणे, नवी मुंबईसोबतच पनवेल, कल्याण, डोंबिवली, वसई- विरारमधील महापालिकांनीही तातडीने उपाययोजना राबवण्याच्या दृष्टीने काही पावले उचलली आहेत.

इथे यंत्रणा वायू प्रदूषणाच्या विळख्यातून नागरिकांचा बचाव करण्यासाठी प्रयत्नशील असतानाच आता नागरिकांनीही या नियमांचे पालन करत संकटाशी लढण्यासाठी आपले योगदान द्यावे असे आवाहनही पालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# महादेव ॲपचा प्रवर्तक सौरभ चंद्राकर आणि ३१ जणांविरोधात गुन्हा दाखल

## खिलाडी बेटिंग ॲपद्वारे सरकारसह अनेकांची १५,००० कोटी फसवणूक

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबई पोलिसांनी पहिल्यांदाच महादेव बेटिंग ॲपचा प्रवर्तक सौरभ चंद्राकर याच्यासह ३१ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. जुगार, फसवणुकीच्या कलमातंर्गत मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र, हा गुन्हा महादेव ॲपऐवजी खिलाडी हे बेकायदेशीर बेटिंग ॲप चालवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माटुंग्यातील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश बनकर यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनकर यांनी न्यायालयात तक्रार दाखल केल्यानंतर न्यायालयाने माटुंगा पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिला असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

त्यानुसार प्रकाश बनकर यांच्या फिर्यादीवरून माटुंगा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) आणि जुगार कायदा व माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनकर यांचा दावा आहे की या आरोपीने खिलाडी बेटिंग ॲप वापरून सरकार आणि इतर अनेक लोकांची १५,००० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. खिलाडी ॲपच्या साहाय्याने आरोपी जुगार



आणि इतर खेळ खेळत होते आणि त्यांनी करोडोंची कमाई केली असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी माटुंगा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. दरम्यान, सौरभ चंद्राकर, रवी उप्पल यांच्यावर यापूर्वी छत्तीसगड पोलिसांनी विविध प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल केला होता आणि त्यांच्याविरुद्ध ईडीने मनी लॉंड्रिंगचा गुन्हाही नोंदवला होता.

सौरभ हा छत्तीसगडमधील भिलाई येथील रहिवासी आहे. सौरभने त्याचा मित्र रवी उप्पलसोबत 'महादेव ऑनलाईन ॲप' सुरू केले. या ॲपवर ऑनलाईन बेटिंग केली जाते. त्याच्याशाही विवाह सोहळ्यात परफॉर्म करण्यासाठी मोठमोठे सेलिब्रिटी आले होते. या लग्नाच्या शाही थाटामुळे आणि खर्चामुळे हे लग्न ईडीच्या निशाण्यावर आले आणि त्यानंतर मनी लॉन्ड्रिंगचे सर्वात मोठे नेटवर्क उघड झाले.

बहुतेक सट्टेबाजी व्हॉट्सॲप नंबरवरून केली जाते आणि एजंट, विविध पॅनल बनवून कमिशन तत्वावर कॉल सेंटर चालवत आहेत. महादेव बुक ॲपचा मुख्य कार्यालय यूएईमध्ये असून ते मुख्य आरोपी सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पल चालवतात. केवळ क्रिकेट सट्टेबाजीवरच नाही तर वेगवेगळ्या राज्यांमध्ये होणाऱ्या निवडणुकांवर सट्टेबाजीसाठीही या ॲपचा वापर केला जात होता. महादेव बुक ॲपसाठी काम करणारे बहुतेक कर्मचारी छत्तीसगडचे आहेत, जे सौरभ आणि रवी उप्पल यांना ओळखतात आणि ते दुबई आणि यूएईमध्ये स्थायिक झाले आहेत.

यावर्षी ऑगस्टमध्ये महादेव बेकायदेशीर सट्टेबाजी ॲप प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने अटक केलेल्या सहाय्यक उपनिरीक्षक (एएसआय) चंद्रभूषण वर्मा यांनी सांगितले होते की, छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांच्या जवळच्या मित्राने हवाला व्यवहाराद्वारे पैसे मिळवले होते, ईडीद्वारे दाखल आरोपपत्रात याचा उल्लेख करण्यात आला आहे.




■ **अँटी फडणवीस नॅरेटिव्ह उद्ध्वस्त**

देवेंद्र फडणवीस यांनी तयार केलेल्या महायुतीने ग्रामपंचायत निवडणुकीत दमदार विजय मिळवला आहे. तर ठाकरे-पवार आणि कॉंग्रेसच्या महाविकास आघाडीला फक्त ५००च्या आसपास ग्रामपंचायती टिकवता आल्या आहेत. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाच्या निमित्ताने महाराष्ट्रात ठाकरे - पवारांच्या गटांनी देवेंद्र फडणवीस यांच्या विरुद्ध वातावरण पेटवण्याचा प्रचंड प्रयत्न केला. मराठी माध्यमांनी देखील त्याला खूप हवा दिली, पण प्रत्यक्ष ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालात मात्र पवारनिष्ठांनी उभा केलेला 'अँटी फडणवीस नॅरेटिव्ह' जनमताने उद्ध्वस्त केला. त्यातही मराठा आंदोलकांनी सिलेक्टिवली गाव बंदी करून भाजप - शिंदे गट यांच्या नेत्यांना गावात येण्यापासून रोखले. काही ठिकाणी अजितदादांच्या नेत्यांना प्रतिबंध केला. खुद्द अजित पवारांना माळेगाव साखर कारखान्यातील मोळी पूजनाला जाण्यापासून रोखले, पण ही गाव बंदी देखील प्रत्यक्ष ग्रामपंचायत निवडणुकीतील मतदानावर प्रतिकूल परिणाम करू शकली नाही. राज्यात तब्बल ७४% मतदान झाले आणि देवेंद्र फडणवीस यांनी तयार केलेल्या महायुतीला प्रचंड बहुमत देत महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातही देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मान्य असल्याचे सिद्ध झाले.

## वांद्रे स्थानकात उभ्या असलेल्या एक्स्प्रेसमध्ये आढळला मृतदेह

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील वांद्रे टर्मिनस रेल्वे स्थानकात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. वांद्रे स्थानकात थांबलेल्या एका एक्स्प्रेसमध्ये एक १५ वर्षांचा मुलगा गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. एक्स्प्रेसमध्ये तरुणाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. हा मुलगा अल्पवयीन असून त्याने आत्महत्या केली की हा घातपात आहे, याचा शोध घेतला जात आहे.

पोलीस सूत्रानुसार, मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटवण्यात आली नसून ही आत्महत्या आहे की घातपाताचा प्रकार आहे याचा शोध पोलीस घेत आहेत. रविवारी रात्री वांद्रे टर्मिनस प्लॅटफॉर्म नंबर तीनवर देहरादून एक्स्प्रेस थांबली होती. या एक्सप्रेसच्या बोगी क्रमाक एस सातमध्ये एक अल्पवयीन मुलगा गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. सोमवारी या दुर्घटनेप्रकरणी पोलीस ठाण्यात नोंद केली आहे. पोलिसांना अद्याप मृत व्यक्तीची ओळख पटवण्यात यश आलेले नाही.

## मध्य रेल्वेच्या प्रवाशांना फलाटांवर मोकळे रान



**खाद्यपदार्थांचे स्टॉल हटवणार**

■ प्रतिनिधी, मुंबई

मध्य रेल्वेच्या उपनगरी मुख्य मार्गावरील स्थानकांच्या फलाटावरील खाद्यपदार्थांचे स्टॉल हटविण्यात येत असल्याने ५० ते ७० प्रवाशांना उभारण्यासाठी जागा होत आहे.

मध्य रेल्वेवरील गर्दीच्या स्थानकांतील फलाटांवरील जागा अनधिकृत फेरीवाल्यांनी व्यापली आहे. मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील काही स्थानकांत गर्दुल्ले, मद्यपींनी फलाटाच्या टोकांना अड्डे वसवले आहेत. काही वेळेला काही गर्दुल्ले आणि मद्यपी फलाटांवरील आसनांच्या शेजारी येऊन बसलेले असतात. त्यांना हटविण्याचा प्रयत्न करूनही ते प्रवाशांना दाद देत नाहीत. कधी-कधी सुरक्षा दलाच्या जवानांनाही बधत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. रेल्वे सुरक्षा दलाने वारंवार कारवाई करूनही गर्दुल्ले हटत नसल्याचे चित्र आहे.

फलाटांवरील स्टॉल आणि स्टॉलजवळील ग्राहकांमुळे प्रवाशांची गैरसोयीचे होते. काही वेळा स्टॉलमुळे प्रवासी धडपडून खाली पडले आहेत. तसेच गर्दीच्यावेळी स्टॉलमुळे प्रवाशांना उभे राहण्यास जागा नसल्याने धक्काबुक्की होते. त्याचे पर्यवसन वादात आणि हाणामारीत होते.

मध्य रेल्वेवरील ठाणे स्थानक सर्वाधिक गर्दीच्या स्थानकापैकी एक आहे. मुख्य मार्ग आणि ट्रान्सहार्बरवरील उपनगरी गाड्या लांबपल्ल्यांच्या गाड्या ये-जा करतात. तसेच ठाणे स्थानकातून रोज पाच लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे गर्दीची कोंडी फोडण्यासाठी सर्वात आधी ठाणे स्थानकातील स्टॉल हटवून इतरत्र स्थलांतरित केले आहेत. ठाणे स्थानकातील फलाट क्रमांक ४-५ वरील दोन स्टॉल हटवले आहेत. यापैकी एक स्टॉल फलाट क्रमांक ९-१० वर आणि एक स्टॉल १० अ वर स्थलांतरित केला आहे. दोन स्टॉल हटवल्याने फलाटावर एकाच वेळी सुमारे १०० ते १४० प्रवासी उभे राहू शकतील इतकी जागा उपलब्ध झाली आहे. मध्य रेल्वेवरील ठाण्यावरील स्टॉल हटवण्यात आले आहेत. तर आता घाटकोपर, दादर येथील स्टॉलची पाहणी करून ते हटवण्यात येणार आहेत.

## कांदिवलीच्या' सीए' ३० लाख रुपयांचा गंडा!

■ प्रतिनिधी, मुंबई

बांगलादेशच्या सीमेवरून आणलेल्या मातीमध्ये सोने आहे. या भूलथापेला कांदिवली येथील एक सीए भुलल्याची घटना नुकतीच घडली.

राजस्थान येथे नगरसेवक असल्याचे सांगणाऱ्या एका व्यक्तीने प्रात्यक्षिक करून सोने काढूनही दाखवले. हे सोने खरे असल्याची शहानिशा केल्यानंतर सीए आणि त्याच्या कुटुंबीयांचा विश्वास बसला आणि त्यांनी ३० लाख रुपये दिले. मात्र, कथित नगरसेवकाने दिलेल्या मातीमध्ये केवळ मातीच होती. याप्रकरणी कांदिवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कांदिवली येथील सीए हे कुटुंबीयांसह जयपूरला लग्नासाठी गेले होते.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
**Public Works Department**
Indira Gandhi Bhavan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg, Bhaindar (W) 401101, Tal. Dis – Thane, 28192828

No.MNP/ PWD / Tender/ 312/2023-24 Date -08/11/2023

// **Tender Notice No.312** //

Mira – Bhaindar Municipal Corporation PWD Department Online Tenders are being invited for **Proposed Construction of Cement concreate road from Shanti Nagar Sector 7 Radhhakrishna Hotel Corner to infront of Alahabad Bank Corner at Miraroad (E.) in MBMC Area (Basic Facility Development Fund)** Works in Government / Semi Government / Public Sector Organizations and Activities / Local Self Government Etc. Against the Contractor. Proceedings for Cancellation of Registration Pursuant to disciplinary Proceedings have been / are in progress. Such Contractors cannot participate in the tender process. Tender Notice and Tender Form on the website https://mahatenders.gov.in from **Dt.10/11/2023 to Dt.27/11/2023 till 12.00 pm.** Tender Form Fee and EMD Should be submitted through online Receipt System, failing which the tender will be disqualified. There is no any concession to qualified unemployed Engineer for EMD / Security Deposit.

The last date for submission of tenders completed in all respects on **Dt.28/11/2023** up to 12.00 pm on the above mentioned website, Mira Bhaindar Municipal Corporation. The tenders shall be opened in the presence /Absense of the bidders or their representatives on **Dt.30/11/2023** at 12.30 pm at the tender scell of Mira Bhaindar Municipal corporation.

Ref.No. : MBMC/PRO/E-987797/2023-24
Date : 08/11/2023

Sign/-
City Engineer
Mira Bhaindar Municipal Corporation

Place :- Bhaindar
Date -08/11/2023

## राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची दिवाळी जोरात

■ प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवाळीच्या तोंडावर आनंदाची बातमी आणली आहे. राज्य सरकारकडून कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात दोन टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला जाणार आहे. याआधी काही महिन्यांपूर्वी सरकारने या महागाई भत्यात ४ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर पुन्हा २ टक्के वाढ करण्याचा निर्णय सरकार घेणार आहे. यामुळे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची दिवाळी जोरात असल्याचे दिसत आहे.

बुधवारी होणाऱ्या कॅबिनेटच्या बैठकीत याबाबत निर्णय होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. याआधी महागाई भत्यात ४ टक्क्यांची वाढ केल्यानंतर कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ४२ टक्के इतका झाला होता. आता शिंदे सरकाकडून यात आणखी २ टक्क्यांची वाढ केली जाणार आहे.

याआधी जून महिन्यामध्ये सरकारने महागाई भत्यात वाढ केली होती. त्यानुसार ४२ टक्के महागाई भत्ता झाला होता. त्यानंतर आता २ टक्क्यांची वाढ होणार असून हा भत्ता ४४ टक्के होणार आह. बुधवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडणार आहे. यात याबाबतचा निर्णय होण्याची शक्यता आहे.

सरकारकडून वर्षातून दोन वेळा कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात वाढ केली जाते. याआधी जूनमध्ये ही वाढ करण्यात आली होती.

**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
ई -निविदा सुचना क्र. ६६ (व्दितीय मागणी) सन २०२३-२०२४

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
| --- | --- | --- |
| १ | एम. आर.ए पोलिस स्टेशन आवारातील सी. इमारतीच्या ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे. | १२.६४ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ९.११.२०२३ ते दि. १६.११.२०२३ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १७.११.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/ १५४०४
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : २/११/२०२३

सही/-
(व्ही.ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डी.जी.आय.पी.आर./४७७८/२०२३

## सर्वसामान्य चहावाला असगर अली बनला मोठा ड्रग तस्कर

**(पान १ वरून)** असगरच्या या चहा स्टॉलवर नेपाळचे ड्रग तस्कर भारतातील ड्रग तस्करांना भेटायचे. असगर अली त्यांना चहा द्यायचा. त्यामुळे असगर अलीची त्यांच्याशी मैत्री झाली होती. तो त्यांच्या निरोपांची देवाणघेवाण करायचा.

२०१९ साली भारतात कोविडची लाट पसरली. त्यामुळे या महामारीच्या काळात संपूर्ण देशात लॉकडाऊन झाला होता. साहजिकच असगर अलीचा चहा स्टॉलही बंद पडला. त्याचवेळी त्याने ड्रग तस्करीच्या व्यवसायात सक्रिय सहभागी होण्याचे ठरवले आणि तो मोठा ड्रग तस्कर बनला.

असगर अलीकडून चरस घेऊन मुंबईत विकणाऱ्या दिपक सिंगची कथाही अशीच आहे. उत्तर प्रदेशच्या मिर्झापूर जिल्ह्यातील रहिवाशी असलेला दिपक सिंग हा प्लंबर म्हणून काम करायचा. मुंबईत जोगेश्वरी पश्चिम येथील बेहराम बाग नाला येथे दिपक सिंगचे वडील राहतात. ते रिक्षा चालवून उदरनिर्वाह करतात. मात्र दिपकला झटपट श्रीमंत बनायचे होते. आणि झटपट श्रीमंतीचा एकमेव मार्ग म्हणजेच ड्रग तस्करी आहे, असा दिपकचा समज असल्याने तो या व्यवसायात आला. आपली ड्रग तस्करीची कृष्णकृत्ये लपविण्यासाठी तो वेगवेगळ्या कॉर्पोरेट कंपन्यांना सुरक्षा रक्षक पुरविण्याचा उजळ माथ्याचा धंदा करत होता. या धंद्याबरोबरच कॉर्पोरेटमधील कर्मचाऱ्यांना तो ड्रग सप्लायही करायचा.

मात्र दिपक असगरची कृष्णकृत्ये एमएचबी पोलिसांनी उघड केली. ही दमदार कामगिरी पोलीस उपायुक्त अजयकुमार बन्सल आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधीर कुडाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल सिद्धे आणि पोलीस उपनिरीक्षक अखिलेश बोंबे व इतर पथकाच्या मेहनतीमुळे यशस्वी झाली.

## सरकारची बळीराजाला दिवाळी भेट; ३५ लाख शेतकऱ्यांना पीकविमा!

■ प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील जवळपास सुमारे ३५ लाख शेतकऱ्यांसाठी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी ऐन दिवाळीच्या तोंडावर अत्यंत गोड बातमी आणली असून, राज्यातील पीक विमा कंपन्यांनी पहिल्या टप्प्यात सुमारे १७०० कोटी रुपये पीकविमा अग्रिम वितरण करण्यास मंजूरी दिली आहे. याचा लाभ राज्यातील विविध जिल्ह्यातील सुमारे ३५ लाख ०८ हजार शेतकऱ्यांना मिळणार आहे. या विमा रक्कमा संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर थेट वितरण करण्यास संबंधित विमा कंपन्यांनी सुरुवात



केली असल्याने बहुतांश ठिकाणी दिवाळीपूर्वी पीक विम्याची अग्रीम रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल.

खरीप हंगामात वेगवेगळ्या जिल्ह्यात हवामानाच्या असमतोलामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. एक रुपयात पीकविमा योजनेमध्ये राज्यातील तब्बल १ कोटी ७१ लाख शेतकऱ्यांनी सहभाग घेतलेला आहे.

अंतरिम नुकसान भरपाई एमएसए अंतर्गत विविध जिल्हा प्रशासनाने संबंधित पीकविमा कंपन्यांना अधिसूचना निर्गमित करून २५% अग्रीम पीकविमा देण्याबाबत आदेश देण्यात आले होते. त्यावरून बहुतांश कंपन्यानी विभागीय आणि राज्य स्तरावर अपील केलेले होते. अपिलांच्या सुनावण्या जसजशा होत गेल्या त्याप्रमाणे आतापर्यंत संबंधित विमा कंपन्यानी एकूण १७०० कोटी रुपये रक्कम देण्याचे मान्य केले आहे. जसेजसे अपिलांचे निकाल येतील, त्यानुसार शेतकरी लाभार्थी संख्या व विम्याची अग्रीम रक्कम यामध्ये मोठी वाढ होणार आहे.

**KLG CAPITAL SERVICES LIMITED**

**Regd. Office** : SKIL House, 209, Bank Street Cross Lane, Fort, Mumbai – 400 023. **CIN** : L67120MH1994PLC218169
**E-mail:** company.secretary@klgcapital.com, **Website:** www.klgcapital.com, **Tel. No.:** +91-22-66199000, **Fax No.:** +91-22-22696024

**Unaudited Financial Results for The Quarter and Period ended 30th September, 2023** (Rs in Lacs except otherwise stated)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | Quarter ended 30/09/2023 (Unaudited) | Quarter ended 30/06/2023 (Unaudited) | Quarter ended 30/09/2022 (Unaudited) | Year ended 31/03/2023 (Audited) | Quarter ended 30/09/2023 (Unaudited) | Quarter ended 30/06/2023 (Unaudited) | Quarter ended 30/09/2022 (Unaudited) | Year ended 31/03/2023 (Audited) |
| 1 | Total income from operations (net) | 18.03 | 19.30 | 19.37 | 84.49 | 18.03 | 19.30 | 19.37 | 84.49 |
| 2 | Net Profit / (Loss) for the Period (Before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (2.76) | (2.37) | (5.77) | (6.17) | (2.77) | (2.37) | (5.77) | (6.63) |
| 3 | Net Profit / (Loss) for the Period Before Tax, (After Exceptional and/or Extraordinary items) | (2.76) | (2.37) | (5.77) | (6.17) | (2.77) | (2.37) | (5.77) | (6.63) |
| 4 | Net Profit / (Loss) for the Period After Tax, (After Exceptional and/or Extraordinary items) | (2.76) | (2.38) | (5.22) | (6.22) | (2.77) | (2.38) | (5.22) | (6.68) |
| 5 | Total Comprehensive Income for the period (Comperising Profit/(Loss) for the Period (After Tax) and Other Comprehensive Income (After Tax) | NA | NA | NA | NA | NA | NA | NA | NA |
| 6 | Equity Share Capital | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year). | - | - | - | 435.69 | - | - | - | 428.74 |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) for Continuing and discontinued operations Basic : | (0.09) | (0.07) | (0.16) | (0.19) | (0.09) | (0.07) | (0.16) | (0.21) |
| | Diluted: | (0.09) | (0.07) | (0.16) | (0.19) | (0.09) | (0.07) | (0.16) | (0.21) |

NOTES :
The above is an extract of the detailed format of Annual / Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Annual Financial Results are available on the Company's website at www.klgcapital.com and the website of Stock Exchanges where the Equity Shares of the Company are listed i.e.,BSE Limited at www.bseindia.com.

By order of the Board of Directors
For KLG Capital Services Limited
Sd/-
CHINTAN RAJESH CHHEDA
Whole time Director - DIN : 08098371

Place: Mumbai
Date : November 08, 2023